**नि.क्र.१०**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ याची साक्ष –**

**मी याद्वारे असे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | राजेंद्र एकनाथ महाजन |
| वय सुमारे | : | ५८ वर्षे, धंदा –इलेक्ट्रीशियन |
| निवासस्थान | : | राहा.जैतापकर कॉलनी, गणेश नगर, रानबांबुळी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग. |

---

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा.सरकारी वकील श्रीम.एस. व्ही. गोबाडे यांचे मार्फत –**

**०१.** पोलीसांनी मला दिनांक ११/०६/२०२५ रोजी पंचनाम्यासाठी बोलावले होते. सदरचा पंचनामा अपघाताच्या जागेचा होता. सदरचे घटनास्थळ कुडाळ रस्त्यावर, आयशर शोरुम, राणे बसस्टॉप जवळ होते. माझे सोबत दुसरे पंच प्रकाश जंगले होते. घटनास्थळ मला फिर्यादी जॉन्सन फर्नांडीस यांनी दाखविले. मी घटनास्थळावर गेलो त्यावेळी तेथे चप्पल वगैरे पडली होती. पोलीसांनी फोटो वगैरे काढले. सदरचा पंचनामा अंदाजे सायंकाळी ५ ते ६ च्या दरम्यान झाला. पोलीसानी माझे समक्ष लिखापढी केली, नकाशा काढला होता. आता मला सदरचा पंचनामा दाखविला, तो तोच आहे. त्यावर माझी व दुस–या पंचाची सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. पी–३/ पीडब्ल्यु–२** देण्यात येते.

**०२.** आता मला पोलीसांनी काढलेले फोटो दाखविले. सदर फोटोमध्ये मी, फिर्यादी, दुसरे पंच व पोलीस आहेत. सदर फोटो सोबत भारतीय साक्ष अधिनियम अन्वये आवश्यक ते प्रमाणपत्र सादर केले असल्याने सदर फोटोस **नि.पी–४/पीडब्ल्यु–२** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपी तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्री.पी. एम. मुजावर यांचे मार्फत –**

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी जॉन्सन हा माझे शेजारी राहतो व आमचे घरगुती संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जॉन्सनच मला पंचनाम्यासाठी घेवून

गेला. आम्ही थेट घटनास्थळावर गेलो. हे म्हणणे खरे आहे की, प्रकाश जंगले यांना देखील जॉन्सननेच फोन करुन बोलावले. हे म्हणणे खरे आहे की, यातील पंच प्रकाश जंगले देखील माझे ओळखीचे आहेत. घटनास्थळावर मी एकच सही केली. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी तो पंचनामा लिहीला व त्यावर मी सही केली. हे म्हणणे खरे आहे की, मी सांगितले व त्याप्रमाणे पोलीसांनी पंचनामा लिहीला असे झालेले नाही. आम्ही घटनास्थळी अंदाजे अर्धा तास होतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर रहदारी असते. हे म्हणणे खरे आहे की, आयशर शोरुमच्या मागे वाडी आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझे समक्ष घटनास्थळावर मोजमापे घेतलेली नाहीत.

**०४.** हे म्हणणे खरे नाही की, आम्ही घटनास्थळी गेलो, आमच्या समक्ष पोलीसांनी पंचनामा केला, फोटो काढले हे मी खोटे सांगत आहे. मी घटनास्थळी गेलो त्यावेळेस आम्ही दोन पंच, फिर्यादी व दोन पोलीस होते. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा पोलीसांनी लिहीला असल्याने त्यात काय लिहिले आहे हे मला सांगता येत नाही.

प्रश्न – तुम्ही पोलीसांनी तयार केलेल्या पंचनाम्यावर फक्त सही केली, वाचला नाही ?
उत्तर – पूर्ण वाचला नाही, थोडा वाचला होता.

**०५.** हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपसातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझा ओळखीचा असल्याने व आमचे घरगुती संबंध असल्याने मी त्याच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>फेरतपास</u>** – नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by AVADHUT GAJANAN DESHINGKAR
Date: 2026.01.20 16:00:29 +0530

**( ए.जी.देशिंगकर )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.

ठिकाण :– ओरोस
दिनांक :–२०/०१/२०२६.